# नियमित दिवाणी दावा क्र. ४२७/२०२४

## निशाणी क्र. १५ वरील आदेश

अर्ज व प्रतिवादीचे म्हणणे निशाणी १७ वाचले. वादी व प्रतिवादी यांचे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी यांनी दिनांक १३/११/२०२४ रोजी पारीत केलेला आदेश वादीने प्रस्तुत दाव्यात आव्हानित केलेला आहे.

२. निशाणी ५ अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ प्रमाणे तुर्तातूर्त मनाई आदेश मिळणेसाठी वादीने सादर केला आहे. सकृतदर्शनी बाजू, न्यायाचा समतोल व मनाई आदेश न दिल्यास अपरिमित नुकसान होईल का? या मुद्दयावर निष्कर्ष नोंदवून आदेश पारीत करणे योग्य व न्याय होईल. सदर अर्जावर आदेश पारीत करणेसाठी वादी व प्रतिवादी यांनी सादर केलेली कागदपत्रे तपासणी करणे आवश्यक आहे. निशाणी ५ अर्जावर प्रतिवादीने म्हणणे सादर करणेस मुदत मागितली आहे.

३. दावा मिळकतीवर वादीने अनधिकृत बांधकाम म्हणजेच मंजूर परवानगीपेक्षा जास्त बांधकाम केले आहे असा प्रतिवादींचा आक्षेप आहे. सादर केलेले कागदपत्र यावरुन बांधकाम हे सन १९८८, १९९५ व २००० सालातील आहे असे सकृतदर्शनी दिसते. दिनांक १३/११/२०२४ रोजीचे स्थळपाहणी याचे नकाशा व मोजमाप अभिलेखावर नाही. तसेच, दिनांक ०४/०९/२०२४ रोजीचे स्थळपाहणी याचे नकाशा अभिलेखावर नाही. निशाणी ५ अर्जावर निष्कर्ष नोंदविणेपर्यंत दावा मिळकतीची आहे ती परिस्थिती जैसे थै ठेवणे न्याय व योग्य होईल. निशाणी ५ अर्जावर सुनावणीअंती आदेश पारीत करेपर्यंत वादी व प्रतिवादी यांनी दावा मिळकतीची परिस्थिती 'जैसे थे' ठेवावी. निशाणी ५ अर्जावर सुनावणी कामी वादी व प्रतिवादी यांना कोणतीही तहकूबी देता येणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-

पनवेल. (कृ. मु. सोनवणे)
दिनांक : १३-१२-२०२४. २रे सह दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर,
पनवेल.